# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ११/०१/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जानेवारी महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, शुक्रवार, दिनांक १८ जानेवारी, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊसभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१. इतिवृत्त कायम करणे.**

**२. प्रश्नोत्तरे.**

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**३.** भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्र येथे पुर्नप्रवाहित टाकीचे बांधकाम व अनुषंगिक कामे करणे.

**४.** कोपरखैरणे कार्यक्षेत्रातील नमुंमपा टी.टी.सी.औ.क्षेत्रातील ए ब्लॉकमधील भुखड क्र. ए -७११ ते ए-६७६, ए-७१२ ते ए-७३७/५, ए-६५० ते ६७ पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरणाने सुधारणा करणे व आर.सी.सी. पावसाळी गटर व फुटपाथ बांधणे.

**५.** कोपरखैरणे कार्यक्षेत्रातील नमुंमपा टी.टी.सी.औ.क्षेत्रातील ए ब्लॉकमधील भुखड क्र. ए - २०५ ते डब्ल्यू-१४० पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरणाने सुधारणा करणे व आर.सी.सी. पावसाळी गटर व फुटपाथ बांधणे.

**६.** घणसोली कार्यक्षेत्रातील नमुंमपा टी.टी.सी.औ.क्षेत्रातील आर ब्लॉकमधील भुखड क्र. आर-११ ते आर-४११, आर-४३३ ते आर-४१७, पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरणाने सुधारणा करणे व आर.सी.सी. पावसाळी गटर व फुटपाथ बांधणे.

**७.** घणसोली कार्यक्षेत्रातील नमुंमपा टी.टी.सी.औ.क्षेत्रातील आर ब्लॉकमधील भुखड क्र. आर-२७४ ते आर-२०१, आर-३१० ते आर-३०५, आर-३२० ते आर-३२१ पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरणाने सुधारणा करणे व आर.सी.सी. पावसाळी गटर व फुटपाथ बांधणे.

**८.** म.औ.वि.मंडळ क्षेत्रातील आर, ए व इ एल ब्लॉक मध्ये स्थापत्य विभागामार्फत होणा-या कॉंक्रीटीकरण व रस्ता रुंदीकरणामध्ये येणारे दिवाबत्तीचे खांब स्थलांतरीत करणे.

**९.** नेरुळ टी.टी.सी.औद्योगिक क्षेत्रातील बाल्मर लॉरी ते लुब्रीझॉल इ. कंपनी पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

**१०.** नेरुळ विभागातील शिरवणे आद्योगिक क्षेत्रातील सायन पनवेल महामार्ग सर्व्हिस रस्ता ते महात्मा गांधीनगर पर्यंतच्या रस्त्याची कॉंक्रीटीकरणाने सुधारणा करणे.

**११.** नेरुळ टी.टी.सी.औद्योगिक क्षेत्रातील इंडीयन ऑईल कंपनी ते बाल्मर लॉरी पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

**१२.** भोकरपाडा येथील जलशुध्दीकरण केंद्रामध्ये सुधारणा, दुरुस्तीची व शिल्लक कामे करणे.

**१३.** अग्निशमन विभागासाठी नवीन वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करणे.

**१४.** ऐरोली सेक्टर ४ प्रभाग १३ मध्ये रस्त्याची सुधारणा करणे.

**१५.** ऐरोली सेक्टर ८अे प्रभाग १७ मध्ये झेविअर स्कूल ते प्रतिक कॉर्नर ते देवेंद्र सोसायटी पर्यत रस्त्याची सुधारणा करणे.

**१६.** ऐरोली सेक्टर ५ प्रभाग १७ मध्ये रस्त्याची सुधारणा करणे.

**१७.** नेरुळ सेक्टर ३ येथील बस डेपो ते राजीव गांधी ब्रीज पर्यत रस्त्याचे डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**१८.** वाशी सेक्टर २ मधील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**१९.** वाशी सेक्टर १ मधील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**२० ते २२. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(२०) शाम ठाकूरच्या घरापासून ते सल्झर पम्प कॅम्पच्या संरक्षण भिंतपर्यंतच्या नाल्यावर आर.सी.सी. भिंत बांधून व स्लॅब टाकून मिळावे. सदर नाला उघडा असल्याकारणाने तिथे नेहमी पाणी साचून रहाते, तसेच परिसरातील नागरिक तेथे कचरा टाकतात, तसेच परिसरातील सर्व घराचे पाणी या नाल्यात येत असल्याकारणाने रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सदर काम करुन मिळावे. (२१) शिवशंकर चाळ ते शिवाजी चौक पुलापर्यंतच्या नाल्यावर आर.सी.सी. भिंत बांधून व स्लॅब टाकून मिळावे.सदर नाला उघडा असल्याकारणाने तिथे नेहमी पाणी साचून रहाते, तसेच परिसरातील नागरिक तेथे कचरा टाकतात, तसेच परिसरातील सर्व घराचे पाणी या नाल्यात येत असल्याकारणाने रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सदरचे काम करुन मिळावे. (२२) नमुंमपा क्षेत्रातील झोपडपटटी विभागात पाण्याची समस्या लक्षात घेता, नवी मुंबईसाठी झोपडीधारकांचे ओळखपत्र सर्वेक्षण २००१ (अर्हता दि.०१.०१.१९९५) झालेल्या सर्वेक्षण पावतीधारकांना १५ ते २० धारकांच्या ग्रुपमधे नळजोडणी मंजूर करणे.

**२३ ते २५. श्री.काशिनाथ जनार्दन पाटील , यांजकडून :-**

(२३) नमुमपाच्या हद्दीमधील न.मु.म.पा. शाळे मधील इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ज्या सवलती मिळतात त्या सवलती बालवाडीच्या विद्यार्थ्यांना देणे. (२४) **नमुंमपाच्या** हद्दी मधील महाराष्ट्र शासनातर्फे केंद्र सरकार अंगीकृत ज्या किलबिल अंगणवाडया चालविण्यात येतात त्या अंगणवाडया महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेणे. (२५) नमुंमपा शाळा क्र.१७ जुईनगर या शाळे भोवती संरक्षक भिंत बांधणे.

**२६ ते २८. श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-**

(२६) नवी मुंबई येथील उरणफाटा पामब्रिज रोड येथील अत्याधुनिक गतीरोधक बसविणे. (२७) ऐरोली शहर झपाटयाने विकसित होत असून वाशी शहरप्रमाणे, एरोली येथे नाटयगृह, खेळाच्या मैदानामध्ये इनडोअरगेम, तरणतलाव, यासारख्या सार्वजनिक सुविधा मिळावे. (२८) ऐरोली से.८ येथील नमुंमपाचे क्रांतीवीर नानासाहेब पाटील उद्यानामध्ये जोगींग ट्रक, नाना-नानी पार्क, लहान मुलामुलींची खेळणी, वाचनालय, सारख्या इतर सुविधा उपलब्ध करुन देऊन सुशोभिकरण करणे.

**२९ ते ३१. श्री. प्रभाकर मरीबा कांबळे, यांजकडून :-**

(२९) ठाणे-बेलापूर रस्त्यालगत लोकमत ते मिलेनियम बिझनेस पार्क रस्ता कॉंक्रीटकरण करणे. (३०) श्रमिक नगर शाळा क्र.३४ चे संरक्षण भिंत व दोन लोखंडी गेट नुतनीकरण करणे. (३१) ठाणे-बेलापूर रस्त्यालगत लोकमत ते मिलेनियम बिझनेस पार्क रिलायन्स भिंतीलगत लेकर कोटेड पदपथ बनविणे.

**३२ ते ३४. श्रीम. राधा भुवन ठाकुर, यांजकडून :-**

(३२) प्र. क्र. ८५, दिवाळे से.११ येथील श्री.आनंदधाम ते मोनार्थ प्लाझा येथील गटाराची दुरुस्ती व पदपाथ व इंटर ब्लॉक बसविणे. (३३) प्र. क्र. ८५, दिवाळे से.११ येथील ॲरेंजा बिल्डींग ते साई पुजा बिल्डींग पर्यंतच्या इंटर ब्लॉक बसविणे. (३४) प्र. क्र. ८५, दिवाळे से.१४ येथील नाखवा बिल्डींग ते तुळशी बिल्डींग पर्यंत गटाराची दुरुस्ती, पदपथ व इंटर ब्लॉक बसविणे.

**३५ ते ३७. श्री. मधुकर बाबु मुकादम, यांजकडून :-**

(३५) संत ज्ञानेश्वर माऊली शाळा क्र.३३ च्या बाजूच्या जागेत रस्त्यालगत सार्वजनिक वाचनालय नागरिकांसाठी लवकरात लवकर बांधावे. (३६) प्र. क्र.४० पावणे येथील अंतर्गत गटारे व फूटपाथ व त्यांची सुधारणा करणे. (३७) प्र. क्र.४० पावणे नाका येथे ठाणे-बेलापूर रोड लगत नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालय बांधणे.

**३८ ते ४०. श्री. नारायण महादू पाटील, यांजकडून :-**

(३८) नमुमपा क्षेत्रातील गावठाणातील जुनी घरे मोडून नवीन घरे बांधलेली आहेत त्या घरांना नळ जोडणी मंजूर करणे.(३९) प्र. क्र. ६९, सेक्टर ०६,स्किम-२, भुखंड सिडकोकडून वर्ग करुन त्या ठिकाणी लवकरात लवकर भाजी मंडई विकसीत करणे. (४०) सिडकोकडून राखीव भुखंड सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्र. क्र. ६९ मधील कुठल्या ठिकाणी राखीव ठेवलेले आहेत. राखीव भुखंडाची यादी. १) भु.क्र.२४-मंदिर, २) भु.क्र. २५- बालवाडी ३) भु.क्र. २५ अ- सोशल फॅलिसिटी ४) भु.क्र.२३ - व्यायामशाळा ५) भु.क्र. २६९ - पोस्ट आणि टेलीग्राम ६) भु.क्र. २७४ - आरोग्य केंद्र ७) भु.क्र. २) सेक्टर - ६ स्कीम - २ - मार्केटसाठी वापर करणे. महानगरपालिकेच्या विकास आराखडयात वरील नमुद आरक्षणे दाखविणे आणि संबंधित भुखंड सिडकोकडून त्वरीत हस्तांतरीत करणे.

**४१ ते ४३. सौ. माधुरी सुतार, यांजकडून :-**

(४१) प्र. क्र. ६७ व ६८ साठी अरुण कुमार नामक उद्यान आहे. सदर उद्यान मुख्य रस्त्यापेक्षा ऊंच करुन अद्याप खेळणी व हिरवळ लावून उद्यानाचे सुशोभिकरण करणे. (४२) शिरवणे गाव व जुईपाडा गावातील रहिवाशी यांच्याकरिता तलावाच्या उत्तर दिशेस प्रवेशद्वार बनविणे. (४३) शिरवणे गावठाण विस्तार योजने अंतर्गत भुखंड क्र. ७७२ रेल्वे संरक्षक भिंतीला समांतर असे गटार बनविणे व रेल्वे क्रॉसिंग येथे कलव्हर्टर बनविणे.

**४४ ते ४६. श्री. चंद्रकांत रामदास पाटील , यांजकडून :-**

(४४) प्र. क्र.२२ महापे येथील एमआडीसी विभागातील आतील रस्ते त्वरीत दुरुस्ती करणे.(४५) प्र. क्र.२२ महापे मधील संभाजी नगर येथे संरक्षक भिंत बांधणे. (४६) प्र. क्र.२२ महापे मधील अडवली-भुतवली गावातील इंदिरा आवास योजनेतील घरांचे सर्व्हेक्षण करणे व नवीन घरे बांधणे.

**४७ ते ४९. श्री. रामाशेठ साहेबराव वाघमारे , यांजकडून :-**

(४७) प्र. क्र. ६१ तुर्भे नाका इंदिरानगर येथील वसाहतीत जाण्याचा मुख्य मार्गाचे आर.सी.सी. गटार व इंटरलॉक बसविणे. (४८) प्र. क्र.६१ तुर्भे नाका येथील राज हॉटेल समोर आंबेडकर नगर येथे जी+१ शौचालय बांधणे. (४९) प्र. क्र.६१ तुर्भे नाका येथे मुतारी बांधणे.

**५० व ५१. श्री. विनित मोतीराम पालकर , यांजकडून :-**

(५०) सिडको नवी मुंबई मध्ये जवळपास २२ वर्षापासून कार्यरत आहे. असे असतांनाही त्यांनी खुप सारे भुखंड बाजार (मार्केट) भावाने विकले आहेत असे असतांना आजही नवी मुंबईतील नागरिकांना लिस प्रिमियम भरावे लागत आहे व त्यासाठी त्यांना नाहरकत दाखला सुध्दा द्यावा लागत आहे. म्हणून अशी विनंती आहे की सदरचे भुखंड हे फ्रि होल्ड करुन देणे. (५१ ) नमुंमपा सन १९९२ पासून अस्तित्वात आल्यापासून नवी मुंबईमध्ये एकाच वेळेस दोन प्राधिकरण कार्यरत असतांना नागरिकांना सिडको व महानगरपालिका दोन्हीकडे याचा भुर्दंड भरावा लागतो. एकाच कामासाठी दोन प्राधिकरणाकडे नागरिकांना फेऱ्या माराव्या लागतात. ७३ च्या संविधानानुसार महापालिका नागरी सुविधा पुरविण्याची पुर्ण जबाबदारी महापालिकेची आहे. नागरी सुविधा पुरविण्यासाठी महापालिकेच्या क्षेत्रामध्ये सिडकोकडे असणारे जे नागरी सुविधांसाठीचे प्लॉट हे मोफत आणि ठरविलेल्या वेळेत (Time Bond) महापालिकेकडे हस्तांतरीत करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ११ जानेवारी २०१३.**